# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट १९५-२३ दिनांक २०/०६/२०२३

## टाटा कॅपिटल कंपनीचा बॅंक अधिकारी असल्याचे भासवुन व्यवसायिक कर्ज मंजुर करुन देतो असे सांगुन दुकानदारांची फसवणुक करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीतील आरोपीतांस अटक मिरारोड पोलीस ठाणेची कामगिरी

दिनांक ०३/०४/२०२३ रोजी मिरारोड पोलीस ठाणे हद्दीतील दीप सागर दुकानाचे मालक नामे सागर रोहिदास काळे, रा. सहकार प्रीमिअर, कनकिया रोड मिरारोड पुर्व हे दुकानात असतांना एक इसम त्यांचे दुकानात येवुन तो टाटा कॅपीटल बॅंकेचा कर्मचारी असल्याचे सांगुन बिझनेस लोन मंजुर करुन देतो असे सांगुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन फिर्यादी यांचेकडुन एच.डी.एफ.सी बॅंकेचे कॅन्सल चेक घेवुन सदर कॅन्सल चेक फिर्यादी यांचे एच.डीएफसी बॅंकेत वटवुन फिर्यादी यांची एकुण ०१,१८,०००/- रुपये किंमती फसवणुक केलेबाबत तक्रार प्राप्त झाल्याने मिरारोड पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. १२७/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४२०,४६५,४६८,४७१,३४ अन्वये दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन वरिष्ठांनी मिरारोड पोलीस ठाणेतील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांना सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे करुन विशेष शोध पथकाची नियुक्ती केली होती.

सदर गुन्हयाचे तपासादरम्यान मिरारोड पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयातील आरोपीतांनी वापरलेल्या मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण केले असता सदर गुन्हयातील आरोपी हे एक मोबाईल नंबर फक्त दोन ते तीन दिवस गुन्हा करणेसाठी वापरत असल्याने निदर्शनास आल्याने सदर आरोपी यांचा शोध घेणे जिकरीचे झाले होते. नमुद गुन्हयातील आरोपी यांनी वापरलेले मोबाईल क्रमांक व त्यातुन मिळालेले मोबाईलचे आयएमईआय क्रमांकावर पाळत ठेवली असता दिनांक १४/०६/२०२३ रोजी नमुद गुन्हयातील आरोपी हे अहमदनगर याठिकाणी गुन्हे करण्याच्या तयारीत असल्याची निदर्शनास आले व सदर आरोपी पळुन जावुन नये म्हणुन आरोपीबाबत अहमदनगर येथील स्थानिक दुकानदारास माहिती देवुन स्थानिक पोलीस ठाणेच्या मदतीने आरोपीतांना पकडण्यात आले. सदर गुन्हयात आरोपी नामे १) मोहम्मद अब्दुल कुद्दुस मेहबुब, रा. उर्दु शाळेजवळ, ता. लखना, जि. हजारीबब, राज्य झारखंड २) एतेशाम एमडीनईम आलम,रा. ३०/२४, ईचारण, घोसलाई, कोलकत्ता ३) अजीज लतीफ शेख, रा. २८/ए, मोमीनपुर रोड, कोलकत्ता ४) मुकेशकुमार दुर्याधन नायक, रा. २३४/ एसीजी बोस रोड, कोलकत्ता, प. बंगाल ५) गंगा लक्ष्मी साहु, रा. सोनारपुर, २४ परगाना, कोलकत्ता यांचा मिरारोड पोलीस ठाणेत दाखल असलेल्या वर नमुद गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक १८/०६/२०२३ रोजी अटक करण्यात आले आहे. नमुद अटक आरोपी यांचेकडे अधिक तपास केला असता त्यांनी गेले एक ते दीड वर्षापासुन अशा प्रकारचे गुन्हे मिरा, भाईंदर, वसई, विरार, मुंबई, नवी मुंबई, पुणे शहर, अहमदनगर, नाशिक, नागपुर तसेच तेलंगणा व सुरत गुजरात राज्यात केले असल्याची माहिती मिळाली आहे. सदर आरोपीतांकडुन आणखी ०३ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.

## -:उघडकीस आलेले गुन्हे:-

| अनु.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.क्र., कलम |
|---|---|---|
| १ | नवघर | I ३३/२०२२ भा.द.वि.सं.कलम ४२०,३४ |
| २ | वालीव | I ५३६/२०२३ भा.द.वि.सं.कलम ४२०,४०६,३४ |
| ३ | रामदासपेठ, अकोला | I ३६/२०२३ भा.द.वि.सं.कलम ४२०,४१७ |

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, मिरारोड, श्री. महेश तरडे, सहायक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली मिरारोड पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजयसिंह बागल, स.पो.नि. शिवकुमार गायकवाड, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. हनिफ शेख, पो.उप.नि. किरण वंजारी, स.फौ. प्रशांत महाले, पो.हवा. प्रफुल्ल महाकुलकर, प्रदीप गाडेकर, बालाजी हरणे, पो.अंम. शंभु शेळके, अथर्व देवरे यांनी केलेली आहे.




----ooo----